सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर पुरुष व स्त्री परीचर ,गट-ड पदभरतीच्या यांच्या प्रसिध्द झालेल्या सुधारित अंतरिम निवड सूचीच्या अनुषंगाने उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी व समुपदेशनासाठी उपस्थित राहणेबाबतची जाहिर सूचना.

संदर्भ:- १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पदभरती जाहिरात २०२३, दि.२८ ऑगस्ट , २०२३.

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, संकेतस्थळावरील सुधारित अंतरिम निवड सुची दि.०१.०३.२०२४.

सार्वजनिक आरोग्य विभाग आयुक्तालय अंतर्गत वैद्यकिय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील गट-ड संवर्गातील पदभरती - २०२३ च्या जाहिरातीस अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर दि. ०१.०३.२०२४ रोजी सुधारित अंतरिम निवड सुची प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सुधारित अंतरिम निवड सुचीत निवड झालेल्या यादीमध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातुन समुपदेशनासाठी उपस्थित रहावे.

उक्त सुधारित अंतरिम निवड सुचीत निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन कार्यक्रम खालील प्रमाणे आयोजित केला आहे.

| अ.क्र | समुपदेशनाच्या पदाचे नाव | समुपदेशनाचा वार, दिनांक व वेळ | समुपदेशनाचे ठिकाण व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | स्त्री परिचर | दि. ०२ मार्च,२०२४, शनिवार, वेळ:- सकाळी ९.०० वाजता | प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे. जुने ज्ञानसाधना कॉलेज जवळ, ठाणे (प) ४००६०४ | प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील मनोरंजन कक्ष. |
| २. | पुरुष परिचर | दि.०४ मार्च,२०२४, सोमवार, वेळ:- सकाळी ९.०० वाजता | | |

तरी वरील प्रमाणे उमेदवारांनी समूपदेशनासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय , ठाणे या ठिकाणी उपस्थित रहावे. ज्या उमेदवारांना समुपदेशनच्या ठिकाणी उपस्थित राहणेबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी या कार्यालयाच्या ई-मेल वर कारणे नमूद करुन तसा ई-मेल संदेशाव्दारे संपर्क साधावा. ई-मेल आयडी :- mentalhospitalrecruitment**2024**@gmail.com

समुपदेशन प्रक्रियेबाबत प्राप्त सुचना परिशिष्ट-ब, परिशिष्ट-क, कुटुंब मर्यादा प्रतिज्ञापत्र व हमीपत्र यासोबत जोडण्यात येत आहे. सदर सुचनांचे अवलोकन करुन निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांचे मुळ दस्ताऐवज व छायांकित प्रतींचे २ संच (स्वसाक्षांकित) , ०२ रंगित पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, १०० रु.बॉंड पेपर व इतर आवश्यक कागदपत्रे करुन न चुकता घेवुन यावे. जाहिरातीतील नमूद सर्वसाधारण सूचनांनूसार सदरचे पत्र आपणांस कार्यालयाच्या ई-मेल व्दारे पाठविण्यात येत असुन आपणांस ई-मेल प्राप्त झाल्यानंतर आपले ई-मेल वरुन स्विकृतीबाबत या कार्यालयाच्या ई-मेल वर कळविण्यात यावे.

( डॉ.नेताजी मुळीक )
वैद्यकिय अधिक्षक
प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे.